# जलसंवर्धन व कोविड लस जनजागृती रॅली

डॉ.आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी नागपूर येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि.१४/८/२०२१ला जलसंवर्धन व कोविड लस जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.लोकांना कोवीड लसीचे व पाण्याचे महत्व पटून देण्याकरिता महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती डॉ.भुवनेश्वरी मेहेरे उपप्राचार्य डॉ.के जी रेवतकर राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.रवींद्र तिरपुडे, यांच्या नेतृत्वात राष्ट्रीय सेवा योजनेच्या ७० विद्यार्थी यांनी महाविद्यालय ते जवळच्या परिसरातील वस्त्यान मध्ये फिरून जनजागृती केली.





















## डॉ. आंबेडकर कॉलेजतर्फे स्वच्छता, कोव्हिड लस जनजागृती

**नागपूर** : करोना प्रतिबंधात्मक लस आणि वृक्षारोपणाबाबत जनजागृती करण्यासाठी दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने अलीकडेच स्वच्छता व वृक्षारोपण रॅलीचे आयोजन करण्यात आले. कोव्हिड लस टोचून घेण्याच्या बाबतीत अनेक नागरिकांच्या मनात अद्यापही शंका आहेत. त्यांच्यात लशीबाबत जनजागृती करून त्यांच्या मनातील शंका दूर करीत लस किती गरजेची आहे, तसेच उत्तम आरोग्याकरिता मानवी जीवनात झाडांचे व स्वच्छतेचे किती महत्त्व आहे, याबाबत जनजागृती करण्यात आली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. भूवनेश्वरी मेहेरे यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छता, करोना लस जनजागृती व वृक्षारोपण याविषयी मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे तसेच स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी कोव्हिड नियमांचे पालन करीत शहराच्या विविध भागात रॅलीद्वारे जनजागृती केली. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. के. जी. रेवतकर, डॉ. रत्नदीप सावंत, गुंजन फुलझेले, कमलेश खैरकर उपस्थित होते.

## लस जनजागृती रॅली

**नागपूर** : डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे कोव्हिड लस, स्वच्छता आणि वृक्षारोपणाविषयी जनजागृती रॅली काढण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी हातात माहितीचे फलक घेऊन जनजागृती केली. प्राचार्या डॉ. भुवनेश्वरी मेहेरे यांनी नागरिकांना लस घेणे किती महत्त्वाचे आहे तसेच स्वच्छता आणि वृक्षारोपण याविषयी मार्गदर्शन केले. या रॅलीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, उपप्राचार्य डॉ. के. जी. रेवतकर, डॉ. रत्नदीप सावंत, गुंजन फुलझेले, कमलेश खैरकर यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

तरुण भारत
Apla Nagpur | 2021-08-21 | Page- 4
epaper.tarunbharat.net

# डॉ. आंबेडकर महाविद्यालयातर्फे लस जनजागृती




◆ नागपूर, २० ऑगस्ट

डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने कोविड लस, स्वच्छता आणि वृक्षारोपणाविषयी जनजागृती रॅली काढण्यात आली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी हातात माहितीचे फलक घेऊन जनजागृती केली. प्राचार्या डॉ. भुवनेश्वरी मेहेरे यांनी नागरिकांना लस घेणे किती महत्त्वाचे आहे तसेच स्वच्छता आणि वृक्षारोपण याविषयी मार्गदर्शन केले. या रॅलीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, उपप्राचार्य डॉ. के. जी. रेवतकर, डॉ. रत्नदीप सावंत, गुंजन फुलझेले, कमलेश खैरकर यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

Powered by Bharati Web Pvt Ltd